आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३१ मार्च २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- ही लोकसभा निवडणूक केवळ सरकार निवडण्यासाठी नाही तर विकसित भारत बनवण्यासाठी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपतींच्या हस्ते भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

- महाविकास आघाडीत जागावाटपावरून कोणताही पेच नसल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं प्रतिपादन

- जागा देण्याबाबत निर्णय होत नसल्यानं महाविकास आघाडीतून बाहेर पडायचा निर्णय घेतल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचं स्पष्टिकरण

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सचा सनरायजर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय

**<><><><><><>**

ही लोकसभा निवडणूक केवळ सरकार निवडण्यासाठी नाही तर विकसित भारत आणि देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी आहे, असं प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज मेरठ इथं भाजपाच्या प्रचारसभेला संबोधित करत उत्तर प्रदेशात भाजपाच्या प्रचाराला सुरुवात केली, त्यावेळी ते बोलत होते. भारताची अर्थव्यवस्था ११व्या स्थानावर असताना, देशातलं गरीबीचं प्रमाण वाढत होतं, मात्र जेव्हा आपण

पाचव्या स्थानावर पोचलो, तेव्हा देशातले २५ कोटीपेक्षा जास्त लोक गरिबीतून बाहेर आले, आता जेव्हा आपण तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू, तेव्हा गरिबी दूर होईल आणि इथला मध्यमवर्ग भारताच्या विकासाला गती देईल असं ते म्हणाले.

भारत उत्पादन क्षेत्रात अभूतपूर्व गुंतवणूक करत आहे, आणि तरुणांना प्रत्येक क्षेत्रात अनेक संधी मिळत आहे असं त्यांनी सांगितलं. आज जगभरात भारताची विश्वासार्हता नव्या उंचीवर पोचली असल्याचं ते म्हणाले.

देशाला भ्रष्टाचाऱ्यापासून वाचवण्यासाठी आपण मोठी लढाई लढत आहोत आणि म्हणूनच आज मोठे भ्रष्टाचारी तुरुंगात आहेत, असं त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षांत अयोध्येत राम मंदिराची उभारणी, वन रँक- वन पेन्शन योजना, त्रिवार तलाक प्रथेविरोधात कठोर कायदा आणि लोकसभा तसंच विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण अशा अशक्य समजल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी झाल्या असं ते म्हणाले.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये कारभार हाती घेतल्यापासून  देशाचा कायापालट केला असं ते म्हणाले.

भाजपनं मेरठ इथून रामायण या गाजलेल्या मालिकेतले कलाकार अरुण गोविल यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज ज्येष्ठ भाजपा नेते आणि माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. राष्ट्रपतींनी अडवाणी यांना हा पुरस्कार त्यांच्या निवासस्थानी जाऊन प्रदान केला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी उपस्थित होते.

<><><><><><>

महाविकास आघाडीत जागावाटपावरून कोणताही पेच नाही, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्लीत इंडिया आघाडीच्या महारॅलीत सहभागी होण्यासाठी आलेले असताना बातमीदारांशी बोलत होते. मुंबईतल्या जागांवरूनही कोणताची वाद नाही, आम्ही विचार करूनच उमेदवार दिले आहेत, आणि जिंकण्याच्या इर्शेनंच लढतो आहोत

भाजपानं अनेक कंपन्यांवार धाडी टाकल्यानंतर त्यांना निवडणूक रोखे मिळाले, हे बींग फुटलं म्हणून, त्यावरून लक्ष विचलित करण्यासाठी भाजपानं अरविंद केजरीवाल यांना अटक केली असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी केला आहे. भाजपा ही देशातला सर्वात मोठा भ्रष्ट पक्ष आहे असं ते म्हणाले. इंडिया आघाडीची रॅली म्हणजे घराणेशाही वाचवण्यासाठीची रॅली आहे, असा आरोप भाजपानं केला असला तरी भाजपानं सर्व भ्रष्ट लोकांना स्वतःच्या पक्षात आणलं आहे, त्यामुळे तेच खऱ्या अर्थानं भ्रष्टांची घराणेशाही झाले आहेत असं ते म्हणाले.

देवंद्र फडनवीस यांनी मणिपूर, लडाखला भेट द्यावी फसवणूक केलेल्या दार्जिलिंग मधल्या निरज झिम्मा, काश्मिरी पंडीत यांची भेट घ्यावी त्यांचा जाण्यायेण्याचा खर्च करायला मी तयार आहे, त्यांनी मणिपूर फाईल्स हा चित्रपटही काढावा, असं आपलं आव्हान असल्याचं ते म्हणाले.

<><><><><><>

दक्षिण सोलापूरचे माजी आमदार दिलीप माने आज काँग्रेसमधे परतले. पूर्वाश्रमीचे काँग्रेसचेच असणारे दिलीप माने यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेत प्रवेश केला, आणि विधानसभा निवडणूकही लढवली. मात्र त्यावेळी त्यांना पराभव पत्करावा लागला होता. ते राष्ट्रवादी काँग्रेसमधे जाणार

अशी चर्चा होती. मात्र आज त्यांनी मुंबईत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि कॉंग्रेसचे जेष्ठ नेते सुशिलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत काँग्रेसमधे प्रवेश केला.

<><><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा निवडणुकीतल्या परिस्थितीचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे उद्यापासून. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

तेव्हा ऐकायला विसरू नका, उद्यापासून. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात च्या दरम्यान दररोज ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’.

<><><><><><>

महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडीला जागा देण्याबाबत त्यांच्याकडून कोणताही निर्णय होत नव्हता, त्यामुळेच आघाडीतून बाहेर पडायचा निर्णय घेतल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज स्पष्ट केलं. ते नागपूरमध्ये वार्ताहर परिषदेत बोलत होते. महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांमध्येच जागा वाटपावरून वाद आहेत, म्हणून आम्ही अशी भूमिका घेतली की, तुमचं भांडण आधी मिटवा. ते मिटलं की, आम्हाला मतदारसंघ मागायला सोपं होईल. परंतु, वंचित आम्हाला जागा कोणत्या पाहिजे ते सांगत नाही असा उलटा दावा ते करत होते, असं ते म्हणाले. काँग्रेसला ७ जागांवर पाठिंबा देऊ, असं सांगितलं होतं. त्यानुसार कोल्हापूर आणि नागपूर या दोन जागांवर आम्ही त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. उरलेल्या जागांची त्यांच्याकडून यादी येईल, त्यानुसार आम्ही त्यांना पाठिंबा देवू, असं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं.

यावेळी त्यांनी भाजपाच्या राजकारणावरही टीका केली. ज्या मतदार संघात महायुतीचं प्राबल्य नाही तिथे उमेदवार पळवणं, इतर पक्षांमध्ये फोडाफोडी करणं, मनसेशी हात मिळवणं असे प्रकार भाजपा करत आसल्याचा आरोपही आंबेडकर यांनी यावेळी केला.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं सनरायजर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय मिळवला.  सनरायजर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आणि निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १६२ धावा केल्या गुजरात टायटन्सनं१९ षटकातच बरोबरी साधली आणि सामन्यातले ५ चेंडू बाकी असतानाच डेविड मिलरनं  उत्तुग षटकार ठोकत संघाला विजय मिळवून दिला. त्यानं नाबाद ४४ धावा केल्या. साई सुदर्शननं ४५, तर शुभमन गिलनं ३६ धावा केल्या, विजय शकरनं नाबाद १४ धावांचं योगदान दिलं.

या स्पर्धेतला दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होत आहे , विशाखापट्टणम इथं थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

येत्या लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगानं एक खिडकी परवानगी कक्षांतर्गत विविध परवानग्यांविषयक कामकाजाबाबत दूरध्वनीद्वारे संपर्कासाठी कल्याण लोकसभा मतदार संघातल्या सहा विधानसभा मतदारसंघामध्ये नियंत्रण कक्ष स्थापन  केले आहेत. डोंबिवली पूर्व येथील वैकुंठवासी हरिभक्तिपरायण सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील कल्याण डोंबिवली महानगरपालिका जलतरण

तलाव कार्यालयात कल्याण लोकसभा नियंत्रण कक्षाचं मुख्य कार्यालय असेल अशी माहिती  अशी माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे.

<><><><><>

देशात यंत्रणांचा गैरवापर सुरु असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज दिल्लीत रामलीला मैदानावर झालेल्या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या महारॅलीत बोलत होते. भाजपानं यंत्रणांना हाताशी धरत काँग्रेसची खाती बंद केली, असा आरोप त्यांनी केला.

<><><><><>

ईस्टर हा सण देशासह जगभरात उत्साहानं साजरा होत आहे. या सणाच्या पूर्वसंध्येला काल मध्यरात्री देशभरातल्या विविध चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उप-राष्ट्रपती जगदीप धनखड,  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

भांडवली बाजारातील महत्त्वपूर्ण बदलांमुळे FPI अर्थात, परदेशी गुंतवणूकदार मार्च २०२४ मध्ये निव्वळ खरेदीदार बनले आहेत, त्यांनी भारतीय भांडवली बाजारात ३५ हजार ९८ कोटी रुपये गुंतवले आहेत. त्यामुळे मार्च महिन्यात काहीवेळा विक्रीला उशीरा झालेल्या विक्रीनंतरही जानेवारी आणि फेब्रुवारीच्या काहीशा खराब कामगीरीनंतर या महिन्यातली बाजाराची कामगीरी लक्षणीय होती.

<><><><><>

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीचा दुसरा भाग, या बातमीपत्रानंतर सव्वा सात वाजता वृत्तविशेष या कार्यक्रमात आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणीच्या समाज माध्यम

खात्यांवर, Mumbai AIR News युट्युब चॅनेलवर आणि आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्टवर देखील हा कार्यक्रम उपलब्ध आहे.

<><><><><><>

येत्या दोन दिवसात कोकणात हवामान कोरडं राहील, तर, मध्य-महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहून तुरळक ठिकाणी रात्र ऊबदार राहायची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. विदर्भातलं हवामान कोरडं राहण्याबरोबरच उष्णतेची लाट येईल, असा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

//<><><><><><>//